फेब्रुवारी 2016 | ₹40 | पृष्ठ संख्या 40 | पुणे, वर्ष 6 | अंक 02

आर्थिक साक्षरता +
पारदर्शकता =
स्वाभिमानी भारत

# अर्थपूर्ण



ढेरपोट्या चीन आणि प्रगत जगासोबत भारताची फरपट

'स्टार्ट अप': भारतीय तरुणांची वेगळी वाट

३२ दिवस, ७०० कोटी रुपये आणि शून्य भ्रष्टाचार

शेतकरी संघटनेच्या विषयपत्रिकेवर 'अर्थक्रांती'

## दावोसच्या बौद्धिक कुस्तीत रघुराम राजन जिंकले, पण...

संपादक
यमाजी मालकर

सहसंपादक
सम्राट शिरवळकर

व्यवस्थापक
अशोक तुळपुळे

संपर्क : editor.arthapurna@gmail.com, 9860580147

**'अर्थपूर्ण' पब्लिकेशन्स प्रा. लि.**
11, 'हर्षदा', रामबाग कॉलनी,
पौड रोड, पुणे 411038
**फोन :** 020-25430540,
www.arthapurna.org

# अर्थपूर्ण

**फेब्रुवारी 2016**

वर्ष सहावे
अंक दुसरा

**डिझाईन**
ऑफबीट कॉन्सेप्ट्स्, पुणे.
9881098010

**व्यवस्थापन साहाय्य**
महेंद्र बनसोडे

**वार्षिक वर्गणी व टपालासंबंधी**
व्यवहारासाठी संपर्क
020-25430540
9921926538
arthapurna.monthly@gmail.com

**जाहिरात संपर्क**
राजन मिडिया स्टेशन
9922920765
अर्चना जोशी
9552591874

'अर्थपूर्ण'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या साहित्य आणि विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

'अर्थपूर्ण' हे मासिक मालक, अर्थपूर्ण पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्याकरिता मुद्रक व प्रकाशक यमाजी मालकर यांनी विक्रम प्रिंटर्स प्रा. लि. 31, 34 पर्वती इंडस्ट्रीयल इस्टेट, पुणे-सातारा रस्ता, पुणे ९ येथे छापून ए-702, साम्राज्य, शिवतीर्थनगर, पौड रस्ता, पुणे 411038 (सुतारदरा बसथांब्याजवळ) येथे प्रसिद्ध केले.
संपादक : यमाजी मालकर

## अनुक्रमणिका

04 **दावोसच्या बौद्धिक कुस्तीत रघुराम राजन जिंकले, पण...**यमाजी मालकर

06 **प्रशासनः एक नवा शोषकवर्ग...**प्रफुल्ल कदम

08 RBI Governor for Transparency...शैलेश गांधी

10 **ही धाडसी निर्णयांची सुरुवात समजायची ?...**भारतीय

12 **प्रवास हवाहवासा वाटावा, असे काही बदल...**भारतीय

14 **'स्टार्ट अप' : भारतीय तरुणांची वेगळी वाट...**भारतीय

16 **अर्थक्रांतीच्या दिशेने**

21 **अर्थभान**

26 32 **दिवस,** 700 **कोटी रुपये आणि शून्य भ्रष्टाचार**

27 **अर्थक्रांतीच का?**

31 **'SIP'च का?...**प्रशांत बने

33 **अर्थक्रांती न्यूज**

38 **अर्थक्रांती : मला असे वाटते**

# दावोसच्या बौद्धिक कुस्तीत रघुराम राजन जिंकले, पण...



**यमाजी मालकर**
ymalkar@gmail.com

**अर्थशास्त्र हा अंतिमत: मानवाला मानवी प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी म्हणजे समृद्ध जगण्याचा विषय आहे, पण दुर्दैवाने आज तो बौद्धिक कुस्ती खेळण्याचा विषय झाला आहे. ही कुस्ती जगात दर मिनिटाला अनेक व्यासपीठांवर चालूच आहे. त्या कुस्तीत कोण जिंकला  हरला हे महत्वाचे नसून जग खऱ्या अर्थाने पुढे जाण्याचा मार्ग प्रशस्त झाला का, हे महत्वाचे आहे.**

दावोसमध्ये जागतिक आर्थिक परिषदेत भारतीय रिझर्व बँकेचे रघुराम राजन काय बोलतात, याकडे जगाचे लक्ष लागले होते. कारण या माणसाने एकदा 2007 -08 च्या मंदीचे भाकीत केले आहे आणि त्याच प्रकारची मंदी पुन्हा येऊ घातली आहे, असेही एक विधान त्यांनी करून झाले होते. जगातील शेअरबाजार कोलमडले आहेत, तेलासह सर्वच वस्तूंचे दर कोसळले आहेत. त्यामुळे जगाची आर्थिक स्थिती नेमकी कशी आहे आणि उद्या काय होणार, याविषयी प्रचंड भीतीमिश्रीत कुतूहल निर्माण झाले आहे. आर्थिक क्षेत्रात तर कोण काय बोलतो, याला काही धरबंध राहिलेला नाही. जे स्वत:ला तज्ज्ञ म्हणवून घेतात, तेही बिळात लपले आहेत. त्यामुळेच राजन यांच्या उद्गारांकडे सर्व जगाचे लक्ष लागले होते.

या सर्व पार्श्वभूमीवर रघुराम राजन दावोसमध्ये जे बोलले, ते फार महत्वाचे आहे. तिकडे जाण्यापूर्वी रिझर्व बँकेच्या सहकाऱ्यांना त्यांनी नव्या वर्षाच्या शुभेच्छा एका पत्राद्वारे दिल्या होत्या आणि रिझर्व बँक 'कागदी वाघ' तर होत नाही ना, अशी शंका उपस्थित केली होती. विशेषतः गरीब दिसला की ठोकायचे आणि वजनदार दिसला की सलाम ठोकायचा, या सध्याच्या शिरस्त्यावर त्यांनी बोट ठेवले होते. नव्या गोष्टी आणि संशोधनाकडे खुली दृष्टी वर्षानुवर्षांच्या पारंपारिक पद्धतींनी मारून टाकली आहे, असेही त्यांनी म्हटले आहे. असा रोखठोक विचार जागतिक व्यासपीठावर त्यांनी मांडावा, अशी अपेक्षा ठेवण्याचे काही कारण नाही. पण एक अर्थतज्ञ म्हणून तटस्थ मांडणीची अपेक्षा होती, ती त्यांनी काही प्रमाणात केली.

राजन यांनी ज्या महत्वाच्या गोष्टी मांडल्या त्यातील सर्वात प्रमुख होती ती, केवळ आर्थिक गणिते मांडून (मॉनेटरी) जगाची आर्थिक स्थिती सुधारेल, या भ्रमातून बाहेर पडण्याची गरज आहे. याचा अर्थ पेशंटला बरे वाटावे म्हणून एखाद दुसऱ्या वेळी वेदनाशामक औषधे दिली जाऊ शकतात, पण त्या औषधांचाच मारा करून पेशंट बरा होईल, असे मानणे मूर्खपणाचे आहे. जगाने चलन छापण्याचे गोल्ड मापदंड (gold standard) सोडला तेव्हापासून नोटा छापून अशी वेदनाशामक औषधे दिली जात आहेत. बाजारात चलनाची तरलता राहील, अशी सतत काळजी घेतली जाते आहे. पण त्या चलनाला वस्तू आणि सेवांची खरी किंमत तर जोडलेली असली पाहिजे ना! ती न जोडता कागदावर आर्थिक गणिते मांडून जग बदलण्याचा प्रयत्न केला गेला आणि त्यामुळे पेशंटचे शरीर आता इतके नाजूक झाले आहे की त्याला कोणतेच औषध लागू पडेनासे झाले आहे.

दुसरी जी गोष्ट त्यांनी सांगितली ती आपल्या देशाच्या दृष्टीने महत्वाची आहे. जगातील गुंतवणूकदार आता स्थिर अशा इमर्जिंग मार्केट्सच्या शोधात असून त्यात भारत अग्रस्थानी आहे. शेअरबाजारातील पडझड हा

मार्केटचा प्रश्न आहे, आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेत एवढे वाईट काही घडलेले नाही, असे ते म्हणाले. याचा अर्थ चीन आणि इतर देशांसोबत आपली सध्या फरपट होत असली तरी भारत त्यातून बाहेर पडेल,असा दिलासा त्यांनी दिला आहे. (याचा अर्थ पुढील काळात भारतातील गुंतवणुकीला चांगली फळे येणार आहेत.)

तिसरी महत्वाची गोष्ट म्हणजे भारतासारख्या इमर्जिंग मार्केटमध्ये सध्या प्रचंड बदल होत आहेत. उदा. भारतात ऑनलाईन मार्केट वेगाने वाढते आहे, त्यामुळे बाजारात उतरणे उत्पादकाला सोपे झाले आहे. रियल इस्टेट उद्योग विस्तारतो आहे. तेलासह सर्वच वस्तूंच्या किंमती कमी होत आहेत, याचा सर्वाधिक फायदा मागणी कायम असलेल्या भारताला होतो आहे. युरोप आणि इतर प्रगत देशांत मागणीच नसल्याने तेथील परिस्थिती वेगळी आहे. भारतीय रुपया जागतिक धक्क्यांनी घसरत असल्याचे दिसत असले तरी तो इतर इमर्जिंग मार्केट्सच्या तुलनेने खूपच स्थिर आहे.

चलनाच्या मुबलकतेमुळे वस्तूंच्या खऱ्या किंमतीच जग विसरले आहे. त्याचे सर्वांत मोठे उदाहरण म्हणजे तेल. हेच तेल 125 डॉलर प्रती डॉलर विकले गेले आणि तेच तेल आज 30 डॉलरपर्यंत खाली आले.म्हणजे त्याची काही मूळ किंमत आहे की नाही? शिवाय नव्या तंत्रज्ञानाने अनेक वस्तूंचे निर्मिती मूल्य एकदम कमी करून टाकले आहे. इलेक्ट्रॉनिक वस्तू हे त्याचे उदाहरण. अशा बदलात अर्थशास्त्रात मानल्या जातात त्या मुलभूत गोष्टी (fundamentals) नेमके कशाला म्हणायचे? अर्थशास्त्र ज्यावर चालविले गेले त्या चलनांच्या मागे जर वस्तू आणि सेवांचे मूल्य जोडले गेले नसेल तर जगातील आजच्या फरपटीचे खरे म्हणजे आश्चर्य वाटण्याचे काही कारण नाही. उतमात केल्यावर कधीतरी माणूस आजारी पडतो, इतके ते साहजिक आहे. पण येथे उतमात केला काही मोजक्या लोकांनी आणि त्याचा फटका साऱ्या जगाला विशेषतः गरीब आणि मध्यमवर्गाला बसतो आहे. जगातील आर्थिक घडामोडींशी आपला संबंध आहे तो असा.

रिझर्व बँकेचे गव्हर्नर आणि अभ्यासक या नात्याने रघुराम राजन हा मोठा माणूस आहे. पण या अर्थाचे सगळे काही बोलून चलनाची मुबलकता कमी करण्यासाठी काय करायला हवे, हे हा माणूस बोलत नाही. किंवा काही मोजक्या ठिकाणी गोठलेला पैसा प्रवाही व्हावा म्हणून नेमके काय झाले पाहिजे, काळ्या पैशांचा रोग शरीरभर पसरला, त्याचे काय करायचे, याविषयीही ते काही बोलत नाहीत. दावोस परिषद सुरू होण्याच्या एक दिवस आधी जगातील संपत्तीच्या टोकाच्या विषम विभागणीविषयी ‘ऑक्सफॅम’ने आपला अहवाल (अर्थक्रांतीच का? - आतील पानावर पहा) प्रसिद्ध केला आहे. त्यातून चलनाने जगात किती गोंधळ घातला आहे आणि जगातील बहुतांश प्रश्नांना ही विषमताच कशी जबाबदार आहे, हे स्पष्ट होते. पण अशी मोठी माणसे केवळ प्रश्नांचीच मांडणी का करतात, हे मोठेच कोडे आहे. रघुराम राजन बोलले चांगले, पण पुन्हा कोडे घालूनच ते मोकळे झाले.

अर्थक्रांतीचे पाच प्रस्ताव त्याही पुढे जातात आणि सांगतात की, पैसा/चलन हे विनिमयासाठी आहे. ते त्याचे मुलभूत काम आहे. त्यामुळे चलन सतत फिरत राहिले पाहिजे आणिते वापरणाऱ्याकडून त्याची नाममात्र फी तेव्हढी घेतली पाहिजे. (उदा. 2 टक्के) पण पैसा वापरण्यासाठी आज जग अव्वाकी सव्वा व्याज घेते. व्याजाच्या या व्यवस्थेने जगात संपत्तीचे प्रचंड केंद्रीकरण तर झाले आहेच, पण श्रम करणाऱ्या आणि उत्पादकाच्या शोषणाची एक मालिकाच उभी केली आहे. आपण काम करतो,घाम गाळतो, रक्त आटवतो,आपण उत्पादन करतो, मग आपण चांगले जगू का शकत नाही, या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी




ही मालिका समजून घेतली पाहिजे आणि ती भेदण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. अर्थक्रांतीचे पाच प्रस्ताव ही मालिका खंडित करू शकते.आकडेवारी असे सांगते की ज्या चलनाचा वापर व्यवहारासाठीच केला गेला पाहिजे, तो वापर आज जगात स्पेक्युलेशनसाठी केला जातो आहे.राजन म्हणतात, मॉनेटरी पॉलिसी जगाचे प्रश्न सोडवू शकत नाही. पण मग नेमके काय करायला हवे, हे ते सांगत नाहीत. फिस्कल, मॉनेटरी आणि क्रेडीट पॉलिसी या तिन्हीही पॉलिसी महत्वाच्या असून त्या तिन्हीही पॉलिसी कशा असल्या पाहिजेत, हे अर्थक्रांतीचे पाच प्रस्ताव सांगतात. राजन आपल्या सहकाऱ्यांना नव्या गोष्टीचा मोकळ्या मनाने स्वीकार करण्यास सांगतात. तसा स्वीकार आजचे अर्थतज्ञ अर्थक्रांतीचा करतील का, हा खरा प्रश्न आहे.

अर्थशास्त्र हा अंतिमत: मानवाला मानवी प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी म्हणजे समृद्ध जगण्याचा विषय आहे,पण दुर्दैवाने आज तो बौद्धिक कुस्ती खेळण्याचा विषय झाला आहे. ही कुस्ती जगात दर मिनिटाला जगात अनेक व्यासपीठांवर चालूच आहे. त्या कुस्तीत कोण जिंकला  हरला हे महत्वाचे नसून जग खऱ्या अर्थाने पुढे जाण्याचा मार्ग प्रशस्त झाला का, हे महत्वाचे आहे. ■